# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


दिनांक- २२/०५/२०२१

प्रेस नोट क्र १३४

## मिरा- भाईन्दर परिसरात मेफेड्रोन ( एम.डी ) विक्री करणारे इसम यांना पकडून त्यांचेकडून मेफेड्रोन ( एम.डी ) हस्तगत करण्यात नयानगर पो.स्टे चे पोलीसांना यश

दिनांक १६/०५/२०२१ रोजी नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील गितानगर फेज-८, कानुंगो ईस्टेट जवळ, मिरारोड पुर्व येथे काही इसम मेफेड्रोन (एम.डी) हा अंमलीपदार्थ विक्री करणेकरीता येणार असलेबाबत गुप्त माहिती मिळाली होती. नमुद बातमीचे अनुषंगाने नयानगर पोलीस ठाण्याचे व.पो.नि. कैलास बर्वे यांचे मार्गदर्शनाने पो.नि/दिलीप सांळुखे, पो.उप.नि/आशुतोष चव्हाण, पो.शि/३२८२ प्रविणराज पवार, पो.ना/२६९ विकास पाटील यांनी सापळा रचून ०५.१५ वाजता छापा टाकून १) अल्तमश युसुफ शेख वय-३० वर्षे, रा. रु.क्र. ३६९, जनता सेवक सोसायटी, माहिम बस डेपोचे मागे, मोरी रोड, सायन मुंबई, २) शोएब नुर मोहम्मद कुरेशी वय ३१ वर्षे, रा. लोधारोड, नयानगर, मिरारोड पुर्व, ३) अल्ताफ युसुफ शेख वय ३८ वर्षे, रा. ००३, ख्वाजा का हिदुस्तान सोसायटी, गिता नगर, फेज-४, कानुंगो ईस्टेट जवळ, नयानगर मिरारोड पुर्व, यांना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यात ६० ग्रॅम मेफेड्रोन (एम.डी) व ५ ग्रॅम चरस व गुन्हयात वापरलेली दोन दुचाकी वाहने असा एकूण १,९१,२००/- रुपयांचा माल मिळून आला. सदर केले कारवाई बाबत नयानगर पो.स्टे. गु.र.न ।। ३१७/२०२१ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम- ८(क), २०, २२, २९ प्रमाणे दि. १६/०५/२०२१ रोजी दाखल करण्यात आला आहे.

गुन्हयाचे तपासा दरम्यान अटक आरोपी यांनी नमुदचा अंमलीपदार्थ (एम.डी.) हे शम्मो ऊर्फ सलमान रा. चामडा बजार, धारावी, मुंबई याचेकडून खरेदी केला असल्याचे निष्पन्न झाले. नमुद आरोपीचे पुर्ण नांव व पत्ता नसतांना पो.उ.नि./आशुतोष चव्हाण व पथक यांनी स्थानिक पोलीसांचे मदतीने आरोपी शमशेर ऊर्फ शम्मो मोहम्मद कुन्नी वय २८ वर्षे, रा. रु.नं-४८०, दुसरा माळा, सचिनम बिल्डींग, धारावी मुंबई यास दि. २१/०५/२०२१ रोजी ताब्यात घेवुन ०५.१५ वाजता अटक करण्यात आलेलो आहे. नमुद आरोपीत याचे राहते घरातून १) १,८०,०००/- रु.किमतीचे १२० ग्रॅम मेफेड्रोन (एम.डी), २) १,०२,०००/- रुपये रोख रक्कम, ३) १०,०००/- रु.कि.चे दोन मोबाईल असा एकूण ०२,९२,०००/- रुपये किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. वर नमुद आरोपी नं. ०१ ते ०४ यांचो दिनांक २६/०५/२०२१ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड असून गुन्हयाचा तपास चालू आहे.

सदरची कामगिरी श्री. अमित काळे,पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, डॉ.श्री. शशिकांत भोसले सहायक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि./कैलास बर्वे पो.नि./दिलीप साळुंखे (गुन्हे), पोउपनि./आशुतोष चव्हाण, पो.ना. ३१४८ संधु, पो.ना. २७९ विकास पाटील, पो.शि. ३२८२ प्रविण पवार, पो.शि. २०५९ इरफान मुलानी, पो.शि. ३४७२ अजय यादव यांनी केलेली आहे.